# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- भाषा ही सभ्यता आणि संस्कृतीचा आत्मा–अभिधम्म दिवस कार्यक्रमात पंतप्रधानांचं प्रतिपादन
- लॉरेन्स बिष्णोई टोळीतल्या निशाणेबाजाला हरियाणातल्या पानिपत इथून अटक
- रेल्वे प्रवासासाठीचं आरक्षण आता १२० ऐवजी ६० दिवसआधी करता येणार
- नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी कॉग्रेसकडून रविंद्र वसंत चव्हाण यांना उमेदवारी

आणि

- न्यूझीलंड विरुद्ध पहिल्या क्रिकेट कसोटीत पहिल्या डावात भारताच्या सर्व बाद ४६ धावा- विराट कोहलीसह पाच खेळाडू शून्यावर बाद

****

भाषा केवळ संवादाचं माध्यम नसून, सभ्यता आणि संस्कृतीचा आत्मा असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. अभिधम्म दिवस आणि पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानिमित्त नवी दिल्लीत, आंतरराष्ट्रीय बुद्धिस्ट महासंघ आणि सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्यानं घेण्यात आलेल्या समारंभात ते आज बोलत होते. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा हा भगवान बुद्धांच्या महान वारशाचा सन्मान असल्याचं पंतप्रधान म्हणाले. करुणा आणि सद्भावनेमुळेच आपण जगाला अधिक चांगलं बनवू शकतो, याची आठवण हा अभिधम्म दिवस आपल्याला करुन देतो, असं त्यांनी नमूद केलं. अभिधम्म दिवसाचं आणि पाली भाषेचं महत्त्व, तसंच बौद्ध धम्माचा समृद्ध वारसा जपण्यासाठी सरकारकडून सुरू

असलेले प्रयत्न याविषयी त्यांनी भाष्य केलं. या कार्यक्रमात बौद्ध भिक्खूंचा सत्कार करण्यात आला.

****

आसाममधल्या अवैध स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याशी संबंधित, नागरिकत्व कायद्याच्या कलम '६ अ' ची घटनात्मक वैधता, सर्वोच्च न्यायालयानं आज चार एक अशा बहुमतानं कायम ठेवली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. आसाम करार, हा बेकायदेशीर स्थलांतराच्या समस्येवरचा राजकीय उपाय होता, असं निरीक्षण न्यायालयानं हा निर्णय देताना नोंदवलं. १९८५ मध्ये आसाम करारानंतर कलम '६ अ' समाविष्ट करण्यात आलं होतं. २०१९ साली आसाममधल्या राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी साठी हे कलम आधारभूत मानलं गेलं होतं. कलम '६ अ' ने आसामसाठी एक विशेष तरतूद तयार केली, ज्याद्वारे १ जानेवारी १९६६ पूर्वी बांगलादेशातून आलेल्या भारतीय वंशाच्या व्यक्तींना त्या तारखेपर्यंत भारताचे नागरिक मानलं गेलं.

****

दिवाळीपूर्वी बाजारातली कांद्याची मागणी पूर्ण करण्यासाठी आज नाशिक ते दिल्ली 'कांदा एक्स्प्रेस' रेल्वे गाडी रवाना करण्यात आली. एक हजार ६०० मेट्रिक टन कांदा घेऊन निघालेली ही विशेष रेल्वे गाडी, येत्या २० ऑक्टोबरला नवी दिल्ली इथं पोहोचणार असून, त्यानंतर हा कांदा दिल्लीतल्या घाऊक बाजारपेठांमध्ये वितरित केला जाईल. ग्राहक व्यवहार विभागाच्या सचिव निधी खरे यांनी आज ही माहिती दिली. लखनौ, वाराणसी आणि ईशान्येकडच्या राज्यांमध्ये देखील लवकरच कांदा एक्स्प्रेस गाड्या रवाना होतील, अशी माहिती त्यांनी दिली.

****

मुंबई पोलिसांनी गँगस्टर लॉरेन्स बिष्णोईच्या टोळीतील आणखी एका निशाणेबाजाला हरियाणातील पानिपत इथून अटक केली आहे. सुखा असं आरोपीचं नाव असून, त्याच्यावर अभिनेता सलमान खानच्या हत्येचा कट रचल्याचा आरोप आहे. बिष्णोई गँगकडून सलमान आणि त्याच्या कुटुंबीयांना अनेकदा धमक्या दिल्या गेल्या असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

****

विमानात स्फोट घडवून आणण्याची धमकी दिल्या प्रकरणी एका अल्पवयीन आरोपीला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. १४ ऑक्टोबर रोजी आरोपीने समाजमाध्यमावरच्या बनावट खात्यावरुन चार विमानांमध्ये स्फोट होणार असल्याचं सांगितलं होतं. यात तीन आंतरराष्ट्रीय विमानं होती. धमकीमुळे दोन विमानांना उशीर झाला तर एक विमान रद्द करावं लागलं होतं.

****

गेल्या जून महिन्यात राष्ट्रीय चाचणी संस्था एनटीएनं घेतलेल्या यूजीसी नेट २०२४ परीक्षेचा निकाल उद्या १८ ऑक्टोबर रोजी जाहीर केला जाईल. संस्थेने समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे.

****

रेल्वेनं प्रवासाच्या आरक्षणाची आगाऊ कालमर्यादा निम्म्यावर आणली आहे. आता प्रवाशांना प्रवासाच्या ६० दिवसांआधी आरक्षण करता येणार आहे. येत्या १ नोव्हेंबरपासून याची अंमलबजावणी सुरू होणार असल्याचं रेल्वे मंडळानं पत्रकाद्वारे कळवलं आहे. सध्या प्रवासाच्या १२० दिवस म्हणजे सुमारे चार महिने आधीच आरक्षण करता येतं, या निर्णयाचा सध्या तिकिट आरक्षित केलेल्या नागरिकांच्या प्रवासावर काहीही परिणाम होणार नाही. परदेशी प्रवाशांसाठी आरक्षणाची ही कालमर्यादा पूर्वीप्रमाणे ३६५ दिवस असेल.

****

राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं देश तसंच राज्यांच्या विकासासाठी, जनहितासाठी अनेक निर्णय घेतले असून प्रवक्त्यांनी सरकारची कामं तसंच पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडावी अशा सूचना भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी दिल्या आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज मुंबईत प्रदेश प्रवक्ते आणि जिल्हा प्रसिद्धीप्रमुखांच्या कार्यशाळेत ते बोलत होते. जोपर्यंत प्रवक्ते आणि प्रसिद्धी प्रमुख म्हणून आपण हे मुद्दे मतदारांसमोर मांडणार नाही तोवर ते तळागाळापर्यंत पोहोचणार नाहीत, याकडे त्रिवेदी यांनी लक्ष वेधलं.

****

मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांनी विधानसभा निवडणुकी दरम्यान काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी प्राप्तिकर विभागास सहकार्य करावं असं आवाहन आयकर उपसंचालक अनिल खडसे यांनी केलं आहे. काळा पैसा वापरला जात असल्याची, किंवा रोख रकमेचे वाटप होत असल्याची किंवा रोख रकमेची

हालचाल होत असल्याबाबत विश्वसनीय मिळाल्यास माहिती १८-००-२३३-०३५५ या टोल फ्री क्रमांकावर अथवा ९४ ० ३३ ९० ९८ ० या क्रमांकावर व्हॉट्सॲप संदेश पाठवावा असं आवाहन खडसे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केलं आहे.

****

नांदेड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी कॉंग्रेसने रविंद्र चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली. पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज पत्रकाद्वारे ही घोषणा केली. रवींद्र हे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांचे ते पुत्र आहेत. वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं इथं विधानसभा निवडणुकीसोबतच लोकसभेची पोटनिवडणूक होत आहे.

****

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज कन्नड विधानसभा मतदार संघाचा आढावा घेतला. स्ट्रॉंगरुम पाहणी, निवडणूक विषयक कामकाजासंदर्भात प्रशासनाने केलेल्या सर्व पूर्वतयारीचं त्यांनी अवलोकन केलं. सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपण करत असलेल्या कामाबाबत पूर्ण माहिती असायला हवी, तसंच मतदान केंद्र, त्याचा परिसर, मतदान यंत्रे, त्याची प्रक्रिया, तसेच मतदान केंद्रावर मतदारांना द्यावयाच्या सुविधांच्या पूर्ततेबाबत प्रत्येक केंद्राधिकाऱ्याने वेळोवेळी आढावा घेण्याची सूचना स्वामी यांनी दिली.

****

वंचित बहुजन आघाडीतर्फे धुळ्यातून माजी नगरसेवक जितेंद्र शिरसाठ यांना विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष अरविंद निकम यांनी आज धुळ्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. शिरसाठ यांनी महापालिकेत १५ वर्ष नगरसेवक म्हणून प्रतिनिधीत्व केलं आहे.

****

विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम आजपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी प्रसारित होणारा हा कार्यक्रम आमच्या Youtube चॅनलवरुनही आपण ऐकू शकाल. आज या कार्यक्रमात जळगाव जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

कसोटी क्रिकेट क्रमवारीत आंतरराष्ट्रीय पातळीवर पहिल्या स्थानावर असलेला भारतीय संघ, न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्याच्या पहिला डावात अवघ्या ४६ धावात तंबूत परतला. भारताची ही देशातली सर्वात कमी आणि एकूण तिसऱ्या क्रमांकाची किमान धावसंख्या आहे. बेंगळुरूमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला आलेला भारतीय संघ खेळपट्टीवर टिकाव धरुच शकला नाही. विराट कोहलीसह भारताचे एकूण ५ खेळाडू शून्यावर बाद झाले. ऋषभ पंतनं २० आणि यशस्वी जयस्वालनं १३ धावा केल्या. मॅट हेन्रीनं १५ धावात ५ तर विल्यम ओरूक यानं १२ धावात ४ बळी घेतले. या कसोटीचा हा दुसरा दिवस आहे. पावसामुळं काल पहिल्या दिवशी खेळ होऊ शकला नव्हता. आजचा खेळ थांबला तेव्हा न्यूझीलंडच्या तीन बाद १८० धावा झाल्या होत्या.

****

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत आज भारताच्या अनंतजीत सिंग याने स्कीट फायनल शॉटगन स्पर्धेत कांस्यपदक पटकावलं. तर मैराज खान याला सहाव्या स्थानावर समाधान मानावं लागलं. तत्पूर्वी आज महिलांच्या स्कीट फायनलमध्ये गनेमत सेखॉन सहाव्या स्थानापर्यंतच पोहोचू शकली.

****

धाराशिव नगरपालिकेतील विविध घोटाळ्यांचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. काही वर्षांपूर्वी शहरातील कचरा संकलन आणि त्यावर प्रक्रिया करून बायोमायनिंग प्रकारच्या प्रक्रियेला कार्यान्वित कण्याअच्या प्रकल्पात हा घोटाळा झाला होता, भाजपाचे माजी आमदार सुरेश धस यांनी राज्य शासनाकडे आणि विधिमंडळात मागणी करून वारंवार पाठपुरावा केल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी राज्याचे पोलीस महासंचालक यांच्या आदेशावरून विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे.

****

तुळजापूर इथल्या श्री तुळजाभवानी मातेची मंचकी निद्रा संपून आज अश्विनी पौर्णिमेला देवी पुन्हा सिंहासनारूढ झाली. अश्विनी पौर्णिमेनिमित्त देवीच्या दर्शनासाठी कालपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली असून तुळजापूरकडे येणारे

सर्व रस्ते भाविकांच्या गर्दीने फुलून गेले असल्याचं आमच्या वार्ताहारनं कळवलं आहे.

****

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात ३० नोव्हेंबर आणि एक डिसेंबर रोजी विशेष लोकअदालतीचं आयोजन करण्यात आलं आहे. ज्या पक्षकरांची तडजोड पात्र दिवाणी तसंच फौजदारी अपीलं उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत त्यांच्यासाठी प्रकरणे आपसी समन्वयातून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकरीता ही एक सुवर्णसंधी आहे. संबधीत पक्षकरांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असं आवाहन करण्यात आलं आहे

****